चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
०७ मे., २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# शुल्लक कारणावरून झगडा भांडण करून अश्लिल शिवीगाळ करणाऱ्या आरोपीस शिक्षा

पोलीस स्टेशन चिमुर अंतर्गत फिर्यादीस शुल्लक कारणावरून अश्लिल शिवीगाळ करणाऱ्या आरोपीस ०६/०५/२०१९ रोजी **श्री. एस. एस. छल्लानी जेएमएफसी कोर्ट चिमुर यांनी शिक्षा ठोठावली आहे.**

पोलीस स्टेशन चिमुर अंतर्गत दिनांक ०५/०७/२०१४ रोजी मौजा मोकाळा येथे यातील **आरोपी नामे रविंद्र ढेकलु घोनमोडे वय ४०, रा. मोकाळा, ता. चिमुर** याने फिर्यादीस म्हटले की, तुझ्या मुलीने माझे ६० रू परत केले नाही. या कारणावरून आरोपीने फिर्यादीसोबत झगडा भांडण करून अश्लिल शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन चिमुर येथे अप.क्र. ३८६/२०१४ कलम २९४, ५०६, ५०९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास सफौ. शामसुंदर गेडाम, पोस्टे चिमुर यांनी पुर्ण करून आरोपी विरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ०२/०४/२०१९ रोजी **आरोपी नामे रविंद्र ढेकलु घोनमोडे वय ४०, रा. मोकाळा, ता. चिमुर यास कलम २४८(२) सीआरपीसी नुसार कलम २९४ भादंवि मध्ये कोर्ट संपेपर्यंत शिक्षा व १,०००/—रू दंड, न भरल्यास ०७ दिवस कारावासाची शिक्षा श्री. एस. एस. छल्लानी जेएमएफसी कोर्ट चिमुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणात सरकार तर्फे **ॲड. संजय ठावरी, सरकारी अभियोक्ता, तर कोर्ट पैरवी म्हणुन नापोका बलदेव कुमरे, पोस्टे चिमुर** यांनी काम पाहिले.

———————————————————————————————

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# शेतात विषारी औषध टाकल्याने जनावरांचा मृत्यु

## आरोपीस कोर्टाने ठोठावली शिक्षा.

पोलीस स्टेशन भिसी अंतर्गत फिर्यादीच्या गायीच्या मृत्युस कारणीभुत असणाऱ्या आरोपीस ०६/०५/२०१९ रोजी **श्री. एस.एस. छल्लानी जेएमएफसी कोर्ट चिमुर यांनी शिक्षा ठोठावली आहे.**

पोलीस स्टेशन भिसी अंतर्गत दिनांक ०६/०२/२०१५ रोजी मौजा डोमा शेतशिवार येथे यातील **आरोपी नामे गोवर्धन पत्रु चौधरी वय ४७ रा. डोमा, चिमुर** याने फिर्यादी नामे सुरेश कवडु गायवकवाड, वय ४७ रा. डोमा. चिमुर यांच्या जय शिवीवान सेवा समिती यांचे मालकीचे गाई शेतात चरत असतांना आरोपीने आपल्या शेतात कोणतीतरी विषारी कीटकनाशक औषध टाकली होती. यामुळे गाय आणि वासरू यांनी ति विषारी औषध खाल्याने ते मरण पावले. अशा फिर्यादीच्या आणि मेडिकल रिपोर्टवरून पोलीस स्टेशन भिसी येथे अप.क्र. ०६/२०१५ कलम ४२९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास सफौ. सुरेश सोनकुसरे, पोस्टे भिसी यांनी पुर्ण करून आरोपी विरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ०६/०५/२०१९ रोजी **आरोपी नामे गोवर्धन पत्रु चौधरी वय ४७ रा. डोमा, चिमुर यास कलम २४८ सीआरपीसी नुसार कलम ४२९ भादंवि मध्ये कोर्ट संपेपर्यंत शिक्षा व २,५००/—रू दंड, न भरल्यास ०७ दिवस कारावासाची शिक्षा श्री. एस. एस. छल्लानी जेएमएफसी कोर्ट चिमुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणात सरकार तर्फे **ॲड. संजय ठावरी, सरकारी अभियोक्ता, तर कोर्ट पैरवी म्हणुन पोहवा. शामराव धुर्वे, पोस्टे भिसी** यांनी काम पाहिले.

---

# स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

## एका आरोपीस ४ लक्ष २० हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक ०६/०५/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामनगर परिसरात पेट्रालिंग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, भगतसिंग चौक चंद्रपुर परिसरात एका इसमाने आपल्या चारचाकी वाहनात अवैध रित्या दारू विक्रीकरीता आणली आहे. अशा माहितीवरून स्थागुशा पथक तात्काळ त्या परिसरात पोहचुन पाहणी केली असता. मिळालेल्या माहितीप्रमाणे एक लाल रंगाची मारोती अल्टो चारचाकी वाहन उभी दिसली. सदर वाहनाजवळील इसमास विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता, वाहनामध्ये १२०० निपा देशी दारू किं. १,२०,०००/—रू, चा माल मिळुन आला. सदरचा माल आणि चारचाकी वाहन मारोती अल्टो क्र. एमएच ३४ एएम १४७१ किं. ३,००,०००/—रू असा एकुण ४ लक्ष २० हजाराचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे मनि कालीदास विश्वास वय ३५, रा. भगतसिंग चौक, शामनगर चंद्रपुर यास अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे, यांचे नेतृत्वात पोउपनि. जावेद शेख, सफो. दौलत चालखुरे, पद्माकर भोयर, पोहवा. महेंद्र भुजाडे, पोशि. कुदंनसिंग बावरी, प्रांजल झिल्पे, प्रफुल मेश्राम यांनी पार पाडली.

———————————————————————————————————————